REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 1 | OCTOBER - 2019

# विजयाताई चौक यांच्या महिलांविषयीच्या सामाजिक कार्याचे अध्ययन

प्रा.डॉ. संजीव सुकदेव पगारे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे, ता.जि.धुळे.



## प्रास्ताविक :—

धुळे शहर आणि परिसरात शैक्षणिक क्षेत्रात कै. विष्णू चौक सर यांच्या यशवंत क्लासने मोठा लौकिक प्राप्त केला होता. याचबरोबर त्यांची राष्ट्रीय सेवा दल आणि समाजवादी पक्ष यातील सामाजिक व राजकीय कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. आपल्या पतीच्या या सामाजिक शैक्षणिक आणि राजकीय कार्यात महिलांच्या त्राता म्हणून प्रसिद्धीस आलेल्या माई अर्थात विजयाताई चौक यांचेही योगदान अनन्यसाधारण राहिले आहे. बॅ. नाथ पै आणि शकुंतलाबाई परांजपे या विद्‌वत समाजकारणी आणि राजकारण्यांच्या कार्याचा आणि विचारांचा प्रभाव माईसाहेब विजयाताईंवर पडला होता. त्यांची भाषणे आणि विचार ऐकून ताई भारावून गेल्यात आणि त्यांचा समाजवादी पक्षात प्रवेश झाला.

कल्याणी कौटुंबिक सल्ला केंद्र आणि आश्रमाची स्थापना करून पीडित—शोषित महिलांना न्यायालयीन आणि सामाजिक क्षेत्रात न्याय प्रदान करण्याचा प्रयत्न केला. पीडित, दुःखित महिलांना कुटुंबीयांनी नाकारले. मात्र ताईंनी त्यांना आश्रय दिला, त्यांचे अश्रू पुसले. म्हणूनच सर्व विधवा, परित्यक्ता, निराश्रित, पीडित महिला ह्या आपल्या या आशास्थान असलेल्या ताईसाहेबांना माई म्हणूनच हाक मारीत. अशा महिलांच्या माई अर्थात ताईसाहेब विजयाताई चौक यांनी केलेले कार्य हे संस्मरणीय ठरले आहे.

## समाजवादी महिला सभा आणि विजयाताई :—

मुंबई येथे समाजवादी महिला सभेचे अधिवेशन भरविण्यात आले होते. ही नामी संधी पाहून विजयाताई शकुंतलाबाई यांच्या आग्रहास्तव सुमनताई भाल्डे व मगरबाईंच्या सोबत या अधिवेशनात सहभाग घेतला. या अधिवेशनात मृणालताई गोरे, प्रमिलाताई दंडवते, अनुताई लिमये, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे अशी या नामवंत नेते आणि विचारवंतांच्या प्रत्यक्ष परिचयातून आणि मार्गदर्शनातून ताईंना महिलांच्या सर्वंकष उत्थानाची आणि कार्याची मोठी प्रेरणा मिळाली. येथूनच ताईंनी समाजवादी महिला सभेच्या कार्याला वाहून घेण्याचा दृढनिश्चय केला. अधिवेशनातून धुळे येथे परत आल्यावर ताईसाहेबांनी सुमन चव्हाण यांच्याकडे अध्यक्षपद आणि सेक्रेटरी पद स्वतः घेऊन घेऊन सन 1967 पासून कार्याला सुरुवात केली. धुळे जिल्हा आणि परिसरात राजकीय क्षेत्रात अनेक महिला मान्यवरांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली होती. मात्र महिलांविषयीच्या सामाजिक क्षेत्रात विजयाताईंनी सुरू केलेल्या समाजवादी महिला सभेची भूमिका आणि योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. या सभेच्या मंचावरून विजयाताईंनी महिलांचे संघटन घडवून महिलांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध लढा उभारला.[1] समाजवादी नेत्यांच्या आणि विचारवंतांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव असलेल्या ताईंनी

समाजवादी महिला सभेच्या कार्याला वाहून घेतले. सन 1975 मध्ये धुळे शहर महिला आघाडीची स्थापना करून लढा तीव्र केला. या आघाडीमार्फत विविध क्षेत्रात नैपुण्य गाजविणाऱ्या कार्यकर्त्या महिलांचा गौरव करण्याचे ठरवून या समितीची स्थापना करण्यात आली. या समितीला ताईंचे उपाध्यक्ष म्हणून मार्गदर्शन मिळाले. येथूनच ताईंच्या महिलांविषयीच्या कार्याला गती प्राप्त झाली. यातूनच समाजवादी महिला सभेची नोंदणी, शाखा, सभासद अशा कामांना गती प्राप्त झाली.[2] महिलांकरिता जाणीव जागृती शिबिरांचे आयोजन करुन शिक्षण, आरोग्य, व्यसनाधीनता, हुंडा निर्मूलन अशा महत्वपूर्ण विषयांवर महिलांना मार्गदर्शन करण्यात येत असे.

## जळीत महिलांविषयीचे कार्य :–

महिलांचे लैंगिक शोषण, बलात्कार, हुंडाबळी, कौटुंबिक अन्याय–अत्याचार अशा घटनांनी ताईंचे मन व्यथीत होत असे. अशा अत्याचारातून महिलांचे बळी जाण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे काही अहवाल व सर्व्हेवरून त्यांच्या लक्षात आले. म्हणून ताईंनी अशा घटनांचा सर्व्हे करून अत्याचारित महिलांना न्याय प्रदान करता यावा, महत्त्वाचे म्हणजे अशा घटना घडायला नको म्हणून ताईंनी आपल्या सामाजिक कार्याची दिशा ठरविली. यातूनच जिल्हा रुग्णालयात भरती करण्यात येणाऱ्या जळीत महिलांच्या कारणमीमांसा व त्यांचा शोध घेण्याकरिता सर्व्हेच्या कार्याला प्रारंभ केला. यातूनच अनेक महत्त्वपूर्ण बाबी त्यांच्या समोर आल्यात. जळण्याची कारणे वरकरणी अपघाती स्वरूपाची दाखविली जात असली तरी मुळाशी या घटनांची कारणे ही वेगळी होती. ताईंनी अशा महिलांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन खऱ्या कारणांचा शोध घेतला. अशा अत्याचारित महिलांना न्याय मिळवून देण्याकरिता त्यांनी आपल्या संघटनातील महिलांव्दारे लाटणे मोर्चा, घंटानाद, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यासारख्या मार्गांचा अवलंब केला. महिलांमध्ये जाणिवा व आत्मविश्वास निर्माण व्हावा याकरिता त्यांनी सभा, शिबिरे, मेळावे मार्गदर्शने इत्यादी प्रभावी अशा सामाजिक उपायांचा स्वीकार केला.[3] महिलांवरील अन्याय–अत्याचाराविरुद्ध भारत सरकारने कायदे केलेले असले तरी न्यायाच्या प्रस्थापनेसाठी अनेक पळवाटा शोधून गुन्हेगार हे सहीसलामत सुटत असतात. याकरिता ताईंनी अशा गुन्हेगारांवर सामाजिक बहिष्काराचे अस्त्र हाती घेतले. घटना घडलेल्या गावांमध्ये बैठका घेऊन पीडितांना न्याय मिळवून देण्याकरिता ताईसाहेब शेवटपर्यंत प्रयत्नशील राहिल्या.

## हुंडाबळी महिलांविषयीचे कार्य :–

हुंडा पद्धतीमुळे महिलांचे जीवन अधिक कठीण बनले होते. ज्या वेळी संसदेत प्रमिलाताई दंडवते यांनी ही क्रूर आणि माणुसकीला काळिमा फासणारी ही प्रथा बंद करण्याकरिता खाजगी बिल मांडले तेव्हा हे बिल पास करण्यात यावे, त्याच्या समर्थनाकरिता धुळ्यातून रक्ताच्या सह्या करून निवेदन पाठविण्याचे ठरले. यात ताईंनी सुरुवातीस स्वतः आपल्या रक्ताची सही करून शासनास निवेदन पाठविले होते. यात मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते महिला–पुरुषांनी सहभाग नोंदविला होता. तसेच हुंडाबळीच्या घटना घडणाऱ्या गावांवर सामाजिक बहिष्कार टाकण्यात यावे असे ताईंनी ठरवीले. याकरिता करमुड (ता. चाळीसगाव, जिल्हा जळगाव) आणि पाटण (ता. शिंदखेडा, जिल्हा धुळे) या गावांवर घडलेल्या अत्याचाराच्या भिषणावह घटनांमुळे सामाजिक बहिष्काराचे हत्यार उपसले. ज्या ज्या गावांमध्ये अशा अनेक घटना घडल्या त्या गावांवर सामाजिक बहिष्कार टाकून धडा शिकविण्यापलिकडे पर्याय राहत नसतो. कारण न्यायालयातून गुन्हेगार मुक्त होत असतात. मात्र सामाजिक बहिष्कार ही सामाजिक पातळीवर मोठी शिक्षाच होती. या धोरणामुळे या पीडितांना न्यायालयातून न्याय मिळत नसे, त्यांना ताई साहेबांच्या या सामाजिक बहिष्कारातून न्याय मिळत असे.[4]

## परित्यक्ता महिला आणि विजयाताई :–

हुंडाबळीच्या आर्थिक शोषणातूनच परित्यक्ता महिलांचा जटिल प्रश्न समाजासमोर येत असतो. अशा महिला परंपरागत सामाजिक आणि धार्मिक अनिष्ट रूढी–परंपरांच्या जोखंडात अडकलेल्या असतात. तसेच त्यांच्याजवळच्याच नातेवाईकांकडून त्यांचे शारीरिक शोषणनही होत असते. अशा अनेक बाबी केलेल्या सर्वेक्षणातून ताईसाहेबांच्या निदर्शनास आल्यात. अशा परित्यक्ता महिलांच्या समस्यांवर उपाययोजना किंवा त्यांच्या समस्या सोडविण्याकरिता ताईसाहेबांनी धुळ्यात मा. मृणालताई गोरे आणि मा. खा. प्रमिलाताई दंडवते यांच्या खास उपस्थितीत परित्यक्ता महिला परिषदेचे आयोजन केले. अशाच परिषदा पुढील काळात तालुक्याच्या ठिकाणीही

भरविण्यात आल्यात. या परिषदांमधून परित्यक्ता महिलांना मोठा विश्वास देऊन त्यांना निसंकोच आणि निर्भयपणे आपली मते मांडण्यास सुचवण्यात आले. त्यामुळे परित्यक्ता निर्भयपणे व्यक्त होऊ लागल्या. महत्त्वाचे म्हणजे सन 1990 मध्ये हजारो महिलांचा मोर्चा विधानसभेवर नेऊन परित्यक्ता महिलांच्या विविध प्रश्नांकडे शासनाला लक्ष देण्यास भाग पाडले.[5] विशेष म्हणजे परितक्ता महिलांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणारा व शासनाच्या कानावर त्या समस्या पोहोचविणारा देशातील हा पहिला मोर्चा होता. यामुळे ताईंच्या परित्यक्ता महिलाविषयीच्या कार्याची नोंद राष्ट्रीय पातळीवर घेतली गेली.

ताई नुकत्यात मोर्चा काढून थांबल्या नाहीत तर अशा परित्यक्ता महिलांना पुन्हा सांसारिक सुख प्राप्त व्हावी याकरिता त्यांच्या पुनर्विवाहाचा धाडसी उपक्रम हाती घेतला. ताईंनी महिलांवरील अन्याय–अत्याचाराविरुद्ध लढण्यासाठी, त्यांना मदत मिळवून देण्यासाठी, स्वयंरोजगार व सल्ला देण्याकरिता कल्याणी कौटुंबिक (आश्रम) केंद्राची स्थापना केली होती. याच केंद्रामार्फत अनेक परित्यक्तांचे व विधवांचे पुनर्विवाह लावून दिले. महत्त्वाचे म्हणजे आंतरजातीय विवाहांनाही प्रोत्साहन देण्यात आले.[6] ताईसाहेबांची ही उपक्रमशीलता धुळे जिल्ह्याच्या सामाजिक आणि धार्मिक वाटचालीत सुधारकांचा वारसा चालविणारी ठरते.

## महिलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्यासाठी प्रयत्न :–

महिलांमध्ये अवैज्ञानिकपणा आणि रूढीप्रमाण्यवाद मोठ्या प्रमाणात असतो आणि त्यामुळेच त्यांचे मोठे नुकसानही होत असते. मंत्र–तंत्र, करणी, जादूटोणा, भूतबाधा, अंगात येणे अशा पारंपरिक संस्कारांच्या महिला मोठ्या प्रमाणात बळी ठरतात. याची जाणीव असलेल्या ताईंनी महिलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी प्रयत्न केला. याकरिता प्रबोधनात्मक शिबिरांचे आयोजन करून महिलांना वैज्ञानिक दिशा देण्याचा प्रयत्न केला.[7] विधवा महिलांची सामाजिक अवहेलना होत असल्याने विधवा महिलांनीही पती असलेल्या महिलांसारखा सामाजिक आणि धार्मिक संस्कार नियमित पार पाडावेत, असे ताईसाहेबांनी आवाहन केले. ह्या बाबी नुसत्याच तत्वज्ञान किंवा विचार म्हणूनच ताई साहेबांनी सांगितल्यात असे नव्हे तर स्वतः कृतीने महिलांसमोर आदर्श घालून दिला. हळदी–कुंकवाचे सामुदायिक कार्यक्रमांचे आयोजन करून ते सुरळीत पार पाडलेत. त्यातून समाजाला एक वेगळी दिशा दिली.

## महिलांची फसवणूक करणाऱ्या बाई–बुवांविरुद्ध कार्य :–

पार्वती मॉ या बाईने भावनगर (गुजरात) येथे अंधश्रद्धाळूपणाचा फायदा घेऊन अनेक महिलांची फसवणूक चालविली होती. या पार्वती मॉ ने केवळ पोटावरुन हात फिरविला असता वांज महिलांना मुले होतात, अशी अफवा पसरविली होती. ही वार्ता समजल्याने ताईंनी या प्रकाराचा छडा लावला व महिलांची केवळ फसवणूकच कशी होत आहे, हे लोकांच्या निदर्शनास आणून दिले. भव्य मेळाव्याचे आयोजन करून मोठ्या प्रमाणात सहभागी झालेल्या महिलांना डॉक्टर व विचारवंतांकडून मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे महिलांच्या मनातून त्या अंधश्रद्धाळू बाबी जाऊन अशा फसवणूक करणाऱ्या बाई बुवांविषयी जाणिवा निर्माण झाल्यात.

थोडक्यात विजयाताई चौक यांचे कार्य हे महिलांकरिता वरदानच ठरले. कारण जाळून मारणे, हुंडाबळी, विधवा, परित्यक्ता, कौटुंबिक छळ, अन्याय–अत्याचार, बलात्कारित महिला, सेक्स कॅण्डलमध्ये अडकलेल्या महिला, बाईबुवांकडून होणाऱ्या फसवणुकी, अंधश्रद्धाळू रितीरिवाज यात अडकलेल्या, शोषण होत असलेल्या पीडितांना न्याय मिळवून देण्याकरिता ताईसाहेबांनी प्रयत्न केलेत.

## संदर्भ :–

1. गव्हाणकर रोहिणी, (संपा.) ***घडता...घडविता*** (महिलांच्या सबलीकरणार्थ लढणाऱ्या स्त्रियांची मनोगते), लोकवांङ्मयगृह, मुंबई पृ. 20
2. चौक विजयाताई, ***खानदेशातील स्त्री चळवळ***, डॉ. मु. ब. शहा संपादित (खानदेशातील चळवळी), खंड–4, धुळे, 2004, पृ. 181
3. गव्हाणकर रोहिणी (संपा.) ***उपरोक्त क्र.*** 1, पृ. 23
4. मोडक श्रावण, ***महिला विश्व***, दिनांक 28 फेब्रुवारी 1994 ची दैनिक सकाळ पुरवणी, धुळे

5. माळी विजया, ***कार्य परिचय,*** (सदर पुस्तिका ही खाजगी वितरणाकरिता असल्यामुळे ती प्रकाशित करण्यात आलेली नव्हती. सदर संकलन ताईंचे सुपुत्र प्रा. प्रीतम चौक यांचेकडून उपलब्ध झाली.) पृ. 6
6. सबनीस डॉ. श्रीपाल संपादित ***महाराष्ट्राच्या इतिहासातील स्त्रियांचे योगदान,*** विद्यावर्धिनी सभेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे, 2007 पृ. 9
7. माळी विजया, ***उपरोक्त क्र. 5,*** पृ. 9



प्रा.डॉ. संजीव सुकदेव पगारे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे, ता.जि.धुळे.

LBP PUBLICATION